# फिनोलेक्स अकॅडमी ऑफ मॅनेजमेंट अॅन्ड टेक्नॉलॉजी रत्नागिरी.

## नोटीस

FAMT/ADMN/497/2022

01/12/2022

9/12/22

**<u>उच्च व्यावसायिक व इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष 2022-23</u>**

इंजिनीअरींग (UG) व एमसीए,एमई (PG) चे शैक्षणिक वर्ष 2022-23 मधील प्रथम / थेट द्वितीय वर्षात प्रवेशीत असलेले विद्यार्थी.

- सदर योजना महाराष्ट्र राज्यातील मुस्लीम,शीख,बुध्दीस्ट,ख्रिश्चन,पारशी,जैन,ज्यु या अल्पसंख्याक प्रवर्गातील विद्यार्थी आहेत त्यांच्यासाठी आहे.
- ही योजना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीया तसेच संस्थास्तरावर ( मॅनेजमेंट कोटा) आणि अगेन्स्ट व्हेकन्सी मधून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठीही लागू आहे.
- विद्यार्थ्याने १०वी ची परीक्षा महाराष्ट्र राज्यातून दिलेली असावी व तो महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.
- मिळणारे लाभ – रु.50000/- प्रति वार्षिक

शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये पदवी (यु.जी.) इंजिनिअरींग व पदव्युत्तर पदवी (पी.जी.) एमसीए,एमई कोर्सला प्रथम / थेट द्वितीय वर्षात प्रवेशीत आहेत अशा सर्व <u>नव्या(NEW)</u> विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या <u>https://mahadbtmahait.gov.in</u> या ऑनलाईन साईटवर शैक्षणिक वर्ष 2022-23 साठी ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे. अंतिम मुदत 31 डिसेंबर 2022 पर्यन्त ऑनलाईन भरून ऑनलाइन सबमीट करावयाचे आहेत.

**<u>वरील योजनांसाठी शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये विद्यार्थ्याची वर्गामधील उपस्थीती प्रत्येक महिन्याची 75% व प्रत्येक सेमीस्टरच्या सर्व परीक्षा देणे आवश्यक आहे.</u>**

## TABLE A

<u>सर्व कागदपत्रे ही **original documents** ची कलर स्कॅन कॉपी किंवा झेरॉक्स कॉपी ची सेल्फ अटेस्टेड केलेली (विद्यार्थ्याने स्वतःची सही झेरॉक्स कॉपी च्या उजव्या बाजूला खाली प्रथम **self attested** असे लिहून त्या खाली सही करावी व त्या खाली आपले पूर्ण नाव लिहावे व नंतर पीडीएफ बनवावी. सर्व स्कॅन कॉपी ह्या **PDF FORMAT** मध्येच पाहिजेत.</u>

| | |
|---|---|
| ज्या विद्यार्थ्यांनी या कॉलेजमध्ये शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये नव्याने प्रथम वर्षात किंवा थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेला आहे व ज्यांनी शैक्षणिक वर्ष 2021-22 मध्ये <u>https://mahadbtmahait.gov.in/</u> या ऑनलाईन साईटवर अर्ज भरलेला आहे त्यांनी त्यांचे अर्ज <u>नवीन **(New)**</u> या प्रकारात कसे भरायचे याची माहिती खालील प्रमाणे. | |
| १) | सर्व प्रथम <u>https://mahadbtmahait.gov.in/</u> या संकेतस्थाळावर जाऊन आपले यूजर आयडी व पासवर्ड वापरुन लॉग इन करावे. |
| २) | त्यानंतर डाव्या साईडला असलेल्या **profile** ऑप्शन मध्ये जाऊन **personal information** मध्ये **update profile as per aadhaar** सिलेक्ट करावे. |
| ३) | त्यानंतर डाव्या साईड ला असलेल्या **profile** ऑप्शन मध्ये जाऊन **personal information, address information, other information** या मध्ये योग्य ते बदल करावेत. (म्हणजे तुमचा पत्ता,बँक अकाऊंट नंबर, इन्कम सर्टिफिकेट, डोमीसाईल सर्टिफिकेट,मोबाइल नंबर, पालकांची माहिती इत्यादि.) |
| ४) | त्यानंतर डाव्या साईड ला असलेल्या **profile** ऑप्शन मध्ये **current course** मध्ये जाऊन आधीची 11वी,12वी,डिप्लोमा,ग्रॅजुएशन ची आधी भरलेली सर्व माहिती डिलीट करायची. त्यानंतर आपण **Finolex Academy** मध्ये ज्या **branch** साठी प्रवेश घेतलेला आहे त्यानुसार माहिती भरावी.<br>**1) Admission Year In Current Course – 2022** **2) Institute State – Maharashtra**<br>**3) Institute District – Ratnagiri** **4) Institute Taluka - Ratnagiri** |

5) Qualification Level - Under Graduate Course किंवा Post Graduate Course तुमच्या कोर्स प्रमाणे सिलेक्ट करावे.

6) Stream – Engineering किंवा MCA तुमच्या कोर्स प्रमाणे सिलेक्ट करावे.

7) College Name / School Name - Hope Foundation and research center's Finolex Academy of Management and Technology, Ratnagiri(3200)

8) Course Name – तुम्ही ज्या ब्रांच ला प्रवेश घेतला आहे ते सिलेक्ट करावे.

9) Admission Type - Through CAP/Govt. Quota / Management Quota / Against Cap Quota

10) CET / Merit Percentage / CLAT Score – इथे CET किंवा JEE चे मार्क लिहावेत.

11) Application Admission ID/CAP ID/CLAT Admit Card No – इथे तुमचा या वर्षीचा नंबर जो तुमच्या प्रोविजनल अलॉटमेंट किंवा ॲडमिशन कन्फर्म झाल्यानंतर जी रीसीप्ट मिळते त्यावर असतो. उदा. EN22... / MC22... / DSE22....

12) Year Of Study – या इथे First Year किंवा Direct Second Year सिलेक्ट करावे.

13) First Year Completed Or Pursuing – इथे Pursuing सिलेक्ट करावे.

14) Admission Date खालील प्रमाणे ऑनलाइन फॉर्म मध्ये भरावी.

| Sr. | Course | Admission Date |
|---|---|---|
| 01 | FIRST YEAR ENGINEERING | 07/11/2022 |
| 02 | FIRST YEAR ENGINEERING | ज्यांची ॲडमिशन 07/11/2022 नंतर झाली आहे त्यांनी ते जेव्हा प्रत्यक्ष वर्गात बसायला लागले ती तारीख. |
| 03 | DIRECT SECOND YEAR ENGG. | ज्यांची ॲडमिशन FAMT मध्ये कन्फर्म झाल्यानंतर ते जेव्हा प्रत्यक्ष वर्गात बसायला लागले ती तारीख. |
| 04 | FIRST YEAR MCA | ज्यांची ॲडमिशन FAMT मध्ये कन्फर्म झाल्यानंतर ते जेव्हा प्रत्यक्ष वर्गात बसायला लागले ती तारीख. |

15) Fees Paid मध्ये तुम्हाला या वर्षी जी फी applicable आहे ती भरावी. तुम्ही जी प्रत्यक्ष फी भरलेली आहे त्याची रीसीप्ट अपलोड करावी. (receipt वरील amount applicable फी पेक्षा कमी भरली असेल तरी त्याचा विचार करू नये. ऑनलाइन फॉर्म भरताना तुम्हाला या वर्षी जी फी applicable आहे तीच भरावी.)

**This fee chart is only applicable for Minority Scheme for newly admitted student in academic year 2022-23**

| Admission in First Year Engg. Fee Amount | Admission in Direct Second Year Engg. Fee Amount | Admission in First Year MCA Fee Amount |
|---|---|---|
| 81251.00 | 81251.00 | 53475.00 |

16) Upload Fees/Admission Receipt/bonafide certificate – या इथे Finolex Academy मध्ये प्रवेश घेतल्या नंतर जी फीची रीसीप्ट मिळाली असेल ती अपलोड करावी.

17) Is Admission Through Open Or Reserved Category – तुमची जी कॅटेगरी असेल ती सिलेक्ट करावी.   18) Mode – Regular सिलेक्ट करावे.

मार्क शीट अपलोड करताना ती 2 सेम ची एकत्र करून सेल्फ अटेस्टेड करून अपलोड करावी. (सेल्फ अटेस्टेड म्हणजे काय हे Table A च्या खाली दिले आहे.)

| | |
|---|---|
| ५) | उत्पन्नाचा दाखला कोणी कोणत्या वर्षाचा लावायचा याची माहिती खालील प्रमाणे. (छायांकित प्रत)<br>१) उत्पन्नाचा दाखला हा विद्यार्थ्याच्या वडिलांचे नावे व तहसीलदारांनी दिलेला हवा.<br>२) वडील हयात नसल्यास आईचे नावाने व वडिलांचा मृत्यु दाखला आवश्यक.<br>३) आई वडील विभक्त रहात असल्यास आईचे नावे व घटस्फोट कोर्ट ऑर्डर आवश्यक.<br>४) आई वडील दोघेही हयात नसल्यास ज्यांनी पालकत्व घेतले आहे त्यांचे नावे व आई,वडील यांचा मृत्यू दाखला आवश्यक.<br>५) वरील पैकी कोणत्याही प्रकारात येत नसल्यास श्री. मिलिंद कोल्हटकर यांना SFC-2 Counter No.07 येथे प्रत्यक्ष येऊन संपर्क करावा.<br><br>उत्पन्नाचा दाखला व व्हॅलिडिटी दिनांक<br>**आर्थिक वर्ष 2021-22 valid upto 31/03/2023**<br>(उत्पन्न मर्यादा आठ लाखा पर्यन्त.)<br><br>काही जणांकडे उत्पन्नाचे दाखले हे मागील तीन वर्षांचे असतात अशावेळी त्या दाखल्यावरील जे उत्पन्नाचे टेबल दिलेले असते त्यातील शेवटचा **row** बघायचा व त्यामध्ये वरील **table** प्रमाणे उत्पन्नाचा दाखला व व्हॅलिडिटी दिनांक चेक करून घ्यावा. |
| ६) | **Past Qualification** – यामध्ये **10** वी पासून पुढे म्हणजेच **SSC,HSC,Diploma,Graduation** याची माहिती तुमच्या कोर्स नुसार जी असेल ती भरावी. **11**वी ची माहिती भरण्याची गरज नाही. तसेच **Diploma,Graduation** याची फक्त शेवटच्या वर्षाची माहिती भरावी. **Diploma,Graduation** यांच्या दोन्ही सेम ची **marksheet** अपलोड करावीत. |
| ७) | गुणांची टक्केवारी काढणे बाबत – तुमच्या अभ्यासक्रमानुसार **HSC,Diploma,Graduation** याची जी टक्केवारी असेल ती भरावी. |
| ८) | **Profile 100%** भरून झाल्यावर डाव्या साइड ला **All schemes** हा ऑप्शन सिलेक्ट करून **Minority Development Department-→Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional courses(DTE)** हि स्कीम निवडून त्या स्कीम साठी **apply** करावे. |
| ९) | **Is this a Renewal Application?** या ऑप्शन ला सर्वांनी **No** असे सिलेक्ट करावे. |
| १०) | **Upload Self Declaration** (कुटुंबातील तुमच्या सख्या भावंडापैकी (तुम्ही धरून) केवळ कोणतेही **02** या स्कीम चा लाभ घेऊ शकतात.) – यातील माहिती पूर्ण भरावी कोठेही **short form** वापरू नयेत उदा. कॉलेज,स्कीम,कोर्स याची नावे पूर्ण लिहावीत. प्रतिज्ञा पत्रावर विद्यार्थ्याची, पालकांची सही असलीच पाहिजे. तसेच त्यावर जे ठिकाण लिहिलेले आहे तिथे तुम्ही कायमस्वरूपी राहत आहात ते ठिकाण लिहायचे आहे.<br>(ऑनलाईन अर्ज भरताना डिक्लरेशन फॉर्म ची आवश्यकता असून तो सर्वांनी आधी डाऊनलोड करुन घेऊन त्यातील माहीती पूर्ण भरुन, स्कॅन करुन अपलोड करणे आवश्यक आहे. हा दर वर्षी नवीन भरायचा असतो. हे मराठी प्रतिज्ञा पत्र फॉर्म हार्ड कॉपी सबमिट करताना **original** आवश्यक असून ते जपून ठेवावे.) |
| ११) | **Upload TC / LC** – ज्यांनी **12** वी नंतर या कॉलेज मध्ये प्रवेश घेतला आहे त्यांनी **12** वी चे **Leaving cert.**, ज्यांनी **diploma** करून या कॉलेज मध्ये प्रवेश घेतला आहे त्यांनी **diploma** चे **Leaving cert.**, ज्यांनी **graduation** नंतर या कॉलेज मध्ये प्रवेश घेतला आहे त्यांनी **graduation** चे **L.C./T.C.** व **HSC/SSC** चे **Leaving cert** एकत्र एकाच पीडीएफ फाइल मध्ये अपलोड करायचे आहे.<br>**LC** व **TC** हे **income and minority declaration form** च्या खाली एकत्र करून एकाच **pdf** मध्ये अपलोड करावे. |
| १२) | फायनल,रीसीट-कम-अॅक्नॉलॉजमेंट पत्रा बाबत. – **Receipt-cum-acknowledgement of confirmation of admission to first/dse/MCA year of under graduate technical course in engg. and tech./mca** - या व्यतीरीक्त कोणतेही वेगळे कागदपत्र अपलोड करु नये. (हे **document** ज्यांनी **CAP** मधून प्रवेश घेतला आहे त्यांच्यासाठी आवश्यक आहे. **Management Quota** किंवा **Against CAP** प्रवेश असल्यास अपलोड करायची |

| | |
|---|---|
| | गरज नाही.) |
| १३) | सर्वात शेवटी **form** पूर्ण भरून झाल्यावर **save** करून सबमिट करावा. ऑनलाईन अर्ज भरताना सर्व माहीती अचूक व पूर्ण भरावी. त्यामध्ये काही चुक केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी हि विद्यार्थ्याची व त्याच्या पालकांची असणार आहे याची कृपया नोंद घ्यावी. |
| १४) | आपले मोबाईल नंबर आधार कार्डला लिंक करुन घ्यावेत व मोबाइल नंबर मध्ये सारखा सारखा बदल करु नये तसेच तुमच्या बँकमधील खात्याला तुमचा आधार नंबर लिंक आहे की नाही याची खात्री करुन घ्यावी. |
| १५) | आपला आधार नंबर एनपीसीआय मॅपरमध्ये लिंक कसणे आवश्यक आहे. तो बँकेने केलेला आहे की नाही याची खात्री करुन घ्यावी. अन्यथा, पोस्ट ऑफिस मध्ये जाऊन, IPPB हा अकाऊंट काढावा. |
| १६) | नॉन आधार हा ऑप्शन घेऊन अर्ज भरला असल्यास योग्य वेळेत आपले आधार कार्ड अपडेट करुन आपली प्रोफाईल अपडेट करुन घ्यावी. याची जबाबदारी ही विद्यार्थ्यांचीच राहील. |
| १७) | गॅप सर्टीफीकेट – मुळ प्रत सेतू मध्ये रजिस्टर केलेली. (ज्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष 2021-22 या वर्षात शिक्षणात खंड पडला आहे अशांसाठी आवश्यक. यामध्ये खंड पडल्याचे कारण व त्या कालावधीत दुसरीकडे शिक्षण घेतले आहे काय? तसेच शिष्यवृत्तीचा लाभ घेतला आहे काय? या बाबत माहिति लिहिलेली हवी.) |

## TABLE B

| | |
|---|---|
| ज्या विद्यार्थांनी शैक्षणिक वर्ष **2022-23** मध्ये प्रथम वर्षात / थेट व्दितीय वर्षात प्रवेश घेतलेला आहे व ज्यांनी **https://mahadbtmahait.gov.in/** या साइट वर या आधी कधीच **registration** केलेले नाही अशा सर्व विद्यार्थ्यानी खालील प्रमाणे अर्ज भरावा. | |
| १) | **https://mahadbtmahait.gov.in/** या संकेतस्थाळावर जाऊन विद्यार्थ्यांनी **New Applicant Registration** करणे आवश्यक आहे. हे रजिस्ट्रेशन करताना तुमचे आधार कार्ड नंबर व त्याला लिंक केलेला मोबाईल नंबर तुमच्या जवळ असणे आवश्यक आहे. सदर मोबाईल नंबरवर आपल्याला ओटीपी प्राप्त होईल. व त्याव्दारे आपल्याला आपले रजिस्ट्रेशन पूर्ण करावयाचे आहे. |
| २) | वरील **TABLE A** मधील सर्व स्टेप्स प्रमाणे आपली **profile** १००% पूर्ण भरून अर्ज **save** करावा व योग्य ती स्कीम निवडून अर्ज ऑनलाइन **submit** करावयाचा आहे. |

वरील सुचने बाबत जे वेळोवेळी बदल होतील ते ज्या त्या स्कॉलरशिप स्कीम प्रमाणे वेबसाइट वर जाऊन प्रत्येकाने वेळोवेळी पहावेत. अधिक माहीतीसाठी विद्यार्थ्यांनी https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावरील व्हीडीओ व महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय व इतर माहीती यांचे अवलोकन करावे. वरील बाबत काही शंका असल्यास विद्यार्थ्यांनी काऊंटर नंबर 07 (SFC-2 मध्ये) ला श्री. मिलिंद कोल्हटकर यांना प्रत्यक्ष येऊन ऑफिस वेळेत संपर्क करावा.

विशेष सूचना - स्कॉलरशिप बाबत लवकरात लवकर माहिति विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावी यासाठी श्री. मिलिंद कोल्हटकर, स्कॉलरशिप विभाग, Finolex Academy, Telegram App च्या ग्रुप मधून मेसेज पाठवत असतात. ज्या कोणाला अशी माहिती मिळणे आवश्यक वाटत असेल त्यांनी 9423875371 हा मोबाइल नंबर आपल्या मोबाइल कॉनटॅक्ट लिस्ट मध्ये save करावा व आपले पूर्ण नाव, कॉलेज रजिस्ट्रेशन नंबर, स्कॉलरशिप स्कीम नाव मला Telegram वर कळवावे. (या बाबत कोणतीही सक्ती नसली तरी माहिति लवकरात लवकर प्राप्त व्हावी यासाठी सर्वानी ग्रुप वर जॉइन व्हावे.)

FINOLEX ACADEMY OF MANAGEMENT AND TECHNOLOGY
FAMT
★ RATNAGIRI ★

प्राचार्य